**दिनांक २७.१०.२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी महोदयांचे अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा निर्यात प्रचलन समिती सभेचे इतिवृत्त.**

दिनांक २७.१०.२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी, भंडारा यांचे अध्यक्षतेखाली, जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा येथील सभागृहात सकाळी ११.०० वाजता अध्यक्षतेखाली **जिल्हा निर्यात प्रचलन** समिती सभेचे आयोजन करण्यात आले होते. सदर सभेत खालील प्रमाणे अधिकारी व औद्योगीक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. योगेश कुंभेजकर (भा.प्र.से.) | जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा उद्योग मित्र समिती, भंडारा. |
| 2. | श्री. एच. के. बदर | महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव, जि.उ.के. भंडारा |
| 3. | श्री. पंकज सारडा | अध्यक्ष, मेटल मॅन्यु. असो. भंडारा. |
| 4. | श्री. सुधांशु चव्हान | प्रतिनिधी, माईल |
| 5. | श्री आर. पी. डेकाटे | प्रतिनिधी, माईल |
| 6. | श्री. अशोक जावरानी | मँगनिज ओर डिलर्स असो. भंडारा |
| 7. | श्री. राकेश वाघाये | प्रतिनिधी, MMPL, भंडारा |
| 8. | श्री. महेन्द्र पटेल | विभागीय व्यवस्थापक, MIDC |
| 9. | श्री. गणेश तईकर | जिल्हा अग्रणी व्यवस्थापक. |
| 10. | श्री. अजय अते | प्रतिनिधी, कृषिविभाग, भंडारा |
| 11. | श्री. सुगत बी. खाकसे | प्रतिनिधी, GST कार्यालय, भंडारा. |
| 12. | श्रीमती उर्मिला द. चिखले | प्रकल्प संचालक, ATMA |
| 13. | श्रीमती संगिता भोंगाडे | जिल्हा संघटक, माविम, भंडारा |
| 14. | श्रीमती प्रिती फुले | अधिक्षकीय अभियंता, MSEDCL |
| 15. | श्री नरेश मलहोत्रा | प्रतिनिधी, ब्रास इंड, असो. भंडारा |

व स्वाक्षरी नोंदवही नुसार उपस्थित ईतर अधिकारी / सदस्य

सर्वप्रथम महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव, जि.उ.के. भंडारा यांनी सर्व उपस्थित सभासद / सदस्य / पदाधिकारी व अधिका-यांचे स्वागत केले व मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निर्यात प्रचलन समिती भंडारा यांचे परवानगीने सभेस सुरवात केली.

| अ. क्र | चर्चेसाठी सादर विषय / मुद्दा | समिती सभेत अध्यक्षांनी दिलेले निर्देश | जबाबदार अधिकारी | अनुपालन पूर्ण करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | एक जिल्हा एक उत्पादन अंतर्गत सुविधा केंद्राची स्थापना करणे. तसेच निर्यातीकरीता जिल्हयातिल उत्पादनांना **G.I. Tag** मानांकन प्राप्त करूनघेणे | सभेत G.I. Tag चिन्नोर धानाला प्राप्त झालेला आहे, असे कळविण्यात आले तेव्हा SAO व P.D. ATMA यांनी या अनुषंगाने निर्याती करीता कसा वापर करावा याबाबत निर्यातकांकरीता आराखडा तयार करून G.I. TAG चा वापराबाबत माहिती उपलब्ध करून द्यावी व याबाबत प्रगती तातडीने सादर करण्याचे निर्देश अध्यक्षांनी दिले. | अधिक्षकीय कृषिअधिकारी, भंडारा. | |
| 2. | Preparation and monitoring implementation of district export plans for Minerals | खनिज (Mineral Ore) निर्याती बाबत खनिज प्रक्रिया उद्योगांना चालना मिळण्याबाबत तसेच जिल्हयातील उद्योजकांना यावर अवलंबून असलेले उद्योग सुरू करता येईल याकरीता श्री अशोक जावरानी यांनी मँगनिज प्रकिया करून | मँगनिज ओर डिलर्स असो. तुमसर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | Mno2 व Silica प्रकल्प स्थापित होऊ शकेल असे सांगितले करिता विजेचे दर कमी करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. MOIL चे अधिका-यांनी देशांतर्गत मागणी जास्त् असल्यामुळे निर्यात शक्य नसल्याचे सांगितले. मा. अध्यक्षांनी मँगनिज ओर डिलर्स असो. यांना क्लस्टर अंतर्गत प्रस्ताव तयार करण्याची सुचना केंली. | | |
| 3. | निर्यातीकरीता Cooling Container उपलब्धते बाबत. / निर्यात विषयी जनजागृती कार्यक्रम | Cooling Container ची सध्या मागणी नाही त्यांना आवश्यकता भासल्यास कार्यवाही करण्यात येईल असे कृषि विभागाचे प्रतिनिधी यांनी सांगितले. | कृषि विभाग भंडारा | |
| 4. | कृषि क्षेत्राशी निगडीत मुद्दे : अपुरी साठवणुक व पायाभुत सुविधा | 2000 टन क्षमतेचे धान्य साठविण्यासाठी गोदाम व शीतगृह तयार करणे<br><br>गोदाम व शीतगृह तयार करणे यात कोण उत्सुक आहेत ते बघावे जेणेकरून शेतक-यांना यात मदत होईल असे अध्यक्षांनी सांगीतले याकरीता सदर संबंधात बुलढाणा अर्बन बँके सोबत Short Video Conference घेण्याची सुचना अध्यक्षांनी केली. | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र. / राईस मिलर्स असोसिएशन / अधिक्षकीय कृषिअधिकारी, भंडारा./ प्रकल्प संचालक, आत्मा | |
| 5. | निर्याती संबधी चर्चिलेले ईतर मुद्दे / ब्रँडींग व पॅकेजिंग | जिल्हयातील ODOP अंतर्गत तांदूळ उत्पादनाचे प्रसिदधीसाठी, K.V.K. कडे ब्रँडीग व पॅकेजिंग विषयी तज्ञ व्यक्ती उपलब्ध नाही असे त्यांनी सांगितल्याचे महाव्यवस्थापक यांनी सांगितले. IIM नागपूर यांचेशी ब्रँडीग व पॅकेजिंगचे मार्गदर्शना करीता संपर्क साधण्याची सुचना मा. अध्यक्षांनी केली.. | जिल्हा पुरवठा अधिकारी/ राईस मिलर्स समुह / अधिक्षकीय कृषिअधिकारी, भंडारा./ प्रकल्प संचालक, आत्मा | |

उपरोक्त प्रमाणे पुढील सभेत सर्व मुद्यांवर कार्यवाही करण्याचे सुचनांसह उपस्थित राहण्याचे निर्देश अध्यक्ष महोदयांनी दिले. यानंतर सर्वांचे आभार मानुन सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक यांनी अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

सदस्य सचिव तथा महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, भंडारा

मा. जिल्हाधिकारी तथा
अध्यक्ष जिल्हा निर्यात प्रचलन समिती,
जिल्हा भंडारा